

**प्रा. डॉ. राजेंद्र शिवयोगी शिरसी**
(एम.ए., एम.फील., पीएच.डी.)
हुतात्मा राजगुरू महाविद्यालय, राजगुरूनगर, पुणे.

**प्रा. डॉ. राजेंद्र शिवयोगी शिरसी** हे खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे हुतात्मा राजगुरू महाविद्यालय राजगुरूनगर येथे अर्थशास्त्र विषयाचे प्राध्यापक म्हणून तसेच अर्थशास्त्र विभाग प्रमुख म्हणून कार्यरत आहेत. अर्थशास्त्र आणि बँकिंग अँड फायनान्स या विषयाचे पदवी आणि पदव्युत्तर अध्यापनाचा त्यांना ३२ वर्षांचा अनुभव असून आतापर्यंत त्यांनी अर्थशास्त्र आणि बँकिंग अँड फायनान्स या विषयांची ६ क्रमिक पुस्तके लिहिलेली आहेत. तसेच राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय चर्चासत्रात सुमारे ३५ विविध विषयांवर शोध निबंध सादर केले आहेत. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या BCUD अंतर्गत बँकिंग अँड फायनान्स या विषयावर त्यांनी लघु शोधप्रबंध पूर्ण केलेला आहे. बँकिंग अँड फायनान्स या विषयासाठी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात ते पीएच.डी. मार्गदर्शक म्हणून कार्य करीत असून त्यांच्या एका विद्यार्थ्याला पीएच. डी. पदवी प्राप्त झाली आहे. २०२१ यावर्षी त्यांची प्राध्यापक पदावर पदोन्नती झालेली आहे. विविध महाविद्यालयांनी आयोजित केलेल्या राष्ट्रीय–आंतरराष्ट्रीय चर्चासत्रांमध्ये शोध निबंधाचे वाचन तसेच तज्ञ मार्गदर्शक म्हणून सहभाग घेतला आहे. शिवाय महाविद्यालयाच्या विविध समित्यांचे प्रमुख म्हणून कार्य केले आहे जसे नॅक समिती, राष्ट्रीय सेवा योजना, बहिषाल शिक्षण मंडळ, वाणिज्य मंडळ इत्यादी. हुतात्मा राजगुरू महाविद्यालयाच्या स्थानिक व्यवस्थापन मंडळाचे सदस्य म्हणून कार्य केले आहे. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या बँकिंग अँड फायनान्स या विषयाच्या सुधारित अभ्यासक्रमासाठी नेमलेल्या उपसमिती मध्ये सदस्य म्हणून त्यांनी कार्य केले आहे.



**डॉ. उमेश चिंधु भोकसे**
(एम.ए., बी.एड., एम.फील., पीएच.डी.)
साहेबराव बुट्टेपाटील महाविद्यालय, राजगुरूनगर, पुणे.

**डॉ. उमेश चिंधु भोकसे** हे खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाच्या साहेबरावजी बुट्टेपाटील महाविद्यालयामध्ये पदवी व हुतात्मा राजगुरू महाविद्यालयामध्ये पदव्युत्तर वर्गातील विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करत आहेत. राजगुरूनगर अभ्यास केंद्रामध्ये यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठात समंत्रक म्हणून कार्यरत आहेत. २०१९ पासून महाविद्यालयात परीक्षा अधिकारी म्हणून काम पाहत आहेत. महाविद्यालय विकास समितीमध्ये विभाग प्रमुख प्रातिनिधी म्हणून २०१९ पासून सदस्य आहेत. मराठी अर्थशास्त्र परिषद व इंडियन इकॉनॉमिक असोसिएशनचे आजीव सदस्य आहेत. महाविद्यालयीन व विद्यापीठ पातळीवर विविध चर्चासत्रे व कार्यशाळांमध्ये सक्रिय सहभाग घेतला आहे. अर्थशास्त्रविषयक स्थानिक, राज्य, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवर शोधनिबंध प्रकाशित झाले आहेत. त्यापैकी चंद्रपूर येथे झालेल्या मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या ४२ व्या राष्ट्रीय अधिवेशनात 'चाकण औद्योगिक वसाहतीमधील आटोमोबाईल उद्योगाचा सामाजिक रचनेवर झालेला परिणाम – एक अभ्यास' या शोध निबंधाला डॉ. ज. फा. पाटील पारितोषिक व सन्मानपत्र देऊन गौरविण्यात आले आहे. त्याचबरोबर पुणे जिल्हा शिक्षण मंडळाच्या प्रा. रामकृष्ण मोरे महाविद्यालयात आयोजित केलेल्या चर्चासत्रामध्ये 'उद्योगांवर जीएसटीचा परिणाम' या शोधनिबंधाला प्रथम क्रमांक प्राप्त झाला आहे. विद्यापीठ अनुदान आयोगाच्या बाराव्या योजनेअंतर्गत कौशल्यभिमुख अभ्यासक्रमावर आधारित कम्युनिटी कॉलेज या उपक्रमात प्रशासकीय काम केले आहे.

**All Semesters Available**

ISBN : 978-93-89529-17-3

PT-3172

**SUCCESS PUBLICATIONS**

*Address :* Radha Krishna Apartment, 535, Shaniwar Peth,
Appa Balwant Chowk, Opp. Prabhat Theatre, Pune - 30.
Ph. No. 24434662, Mobile : 9325315464
E-mail : sharpgroup31@rediffmail.com
Website : www.sharpmultinational.com

एम. ए. अर्थशास्त्र (कृषी अर्थशास्त्र) (EC-1004)

M.A. I. (Sem. - I)

# अर्थशास्त्र

## कृषी अर्थशास्त्र

## (EC-1004)

M.A. - I, Sem. - I

♦ प्रा. डॉ. राजेंद्र शिवयोगी शिरसी ♦ डॉ. उमेश चिंधु भोकसे

Choice Based Credit System (CBCS)



As Per New Syllabus 2019

**SUCCESS PUBLICATIONS**